**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 28th August 2018**

**Post Event article regarding Finacc 2018 and Mathematrix 2018**

पोदार कॉलेजचं कॅम्पस अलीकडेच फेस्टिव्हलमय झालं होतं. अकाऊंट्स आणि मॅथ्स या दोन विषयांवर आधारित दोन वेगवेगळे फेस्टिव्हल पोदार कॉलेजमध्ये नुकतेच पार पडले. यापैकी 'फिनॅक' हा फायनान्सवर तर 'मॅथेमॅट्रिक्स' हा गणितावर आधारित होता...

# पोदार 'फेस्टिव्हल'मय

## 'फिनॅक'चं खातं टॅली

जर्नलएंट्री, बॅलन्सशीट, प्रॉफिट अँड लॉस असे शब्द कानांवर पडले की अकाऊंट्स, फायनान्स आठवतं. यावरच आधारित 'फिनॅक' हा फेस्टिव्हल पोदार कॉलेजमध्ये नुकताच पार पडला. या फेस्टिव्हलचं आयोजन पोदारच्या अकाउंट्स आणि फायनान्स सर्कलनं केलं होतं. अकाउंटिंग तसंच फायनान्स या विषयावर आधारित वेगवेगळ्या स्पर्धा फेस्टिव्हलमध्ये होत्या. इंटर कॉलेजिएट इव्हेंट असल्यानं इतर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला होता. 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टिव्हलचा मीडिया पार्टनर होता.

'फिनॅक'चं यंदा चौथं वर्ष होतं. फेस्टिव्हलचं उद्घाटन संकेत गोडबोले यांच्या हस्ते झालं. गोडबोले यांनी बिझनेस, मार्केटिंग, फायनान्शिअल मॅनेजमेन्ट या विषयांची गुंफण करत विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केलं. या फेस्टिव्हलमध्ये चार महत्त्वाचे इव्हेंट्स पार पडले. 'क्विझ- ओ- काउंट्स', 'एक्सप्लोरो प्रेझेंताडो', 'द बिझनेस ॲनालिस्ट' यासारख्या इव्हेंट्सचा त्यात समावेश होता. 'द बिझनेस ॲनालिस्ट' आणि 'क्विज ओ काउंट्स' या इव्हेंट्समध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. 'एक्सप्लोरो प्रेझेंताडो' या इव्हेंटमध्ये सर्व स्पर्धकांनी, त्यांना दिलेल्या विषयांवर प्रेझेंटेशन केलं. ज्यामुळे अकाउंट्स, बिझनेस आणि मार्केटिंग या विषयांवर विद्यार्थ्यांची मतं जाणून घेण्यात आली.



## 'मॅथमॅट्रिक्स'मधून गणिताचे धडे

गणित विषय म्हटला की अनेक मुलांच्या अंगावर भीतीने शहारा येतो. पण गणिताची भीती मुलांच्या मनातून काढून टाकावी यासाठी पोदार कॉलेजमध्ये 'मॅथेमॅट्रिक्स' हा एक फेस्टिव्हलच नुकताच पार पडला. लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेक जण यात सहभागी झाले होते. फेस्टिव्हलच्या दरम्यान गणिताचे गंमतशीर विविध प्रयोग झाले. गणितातल्या संकल्पना सोप्या करून सांगणारं एक प्रदर्शनही यावेळी भरवण्यात आलं होतं. झिरो ते इन्फिनिटीच्या सर्व संकल्पना या प्रदर्शनामध्ये दाखवल्या गेल्या. 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टिव्हलचा मीडिया पार्टनर होता.

पहिल्या दिवशी शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी एक मॅथेमॅजिशियन शो ठेवण्यात आला होता. ज्यामध्ये जादूगार फर्नांडिस यांनी गणितातल्या विविध जादू दाखवत विद्यार्थ्यांना गणित सोपं करून दाखवलं. वलान्स फर्नांडीस यावेळी म्हणाले की, 'गणित हा अवघड विषय नसून, उलट खूप मजेशीर विषय आहे. यामध्ये निरनिराळ्या जादू आहेत. प्रदर्शनात दाखवण्यात आलेल्या बऱ्याच गोष्टी मीसुद्धा पहिल्यांदाच बघितल्या. मलाही या प्रदर्शनातून खूप काही नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या.' शाळेतील मुलांसाठी गणितावर आधारित एक सेमिनार ठेवण्यात आलं होतं. गणिततज्ज्ञ विवेक पाटकर यांनी विद्यार्थ्यांना गणितातल्या निरनिराळ्या ट्रिक्स समजावून सांगितल्या. पहिल्या दिवशी शाळकरी विद्यार्थ्यांसाठी फोर डी क्विज, न्यूमेट्रो आर्ट, मूव्ह विथ मॅथ्स अशा वेगवेगळ्या स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या. 'मॅथेमॅट्रिक्स'चा दुसरा दिवस कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी होता. 'बॅटल ऑफ बिड्स' या इव्हेंटमध्ये अनेक विद्यार्थ्यांचा सहभाग होता. दैनंदिन जीवनामध्ये गणित किती महत्त्वाचं असतं याची माहिती फेस्टिव्हल्समधील इव्हेंट्सद्वारे करून देण्यात आली.

संकलन - रोहीत पाटील, पोदार कॉलेज